**जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या पदाधिका-यांसाठी तसेच ग्रामपंचायतीच्या <u>कार्यालयामध्ये आचारसंहिता लागू करणेबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : झेडपीए १००५/९४ मुस/प्र.क्र.१०४/पंरा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १७ जुलै, २००७.**

**वाचा:-** १) शासन परिपत्रक क्रमांक : झेडपीए १००५/९४ मुस/प्र.क्र.१०४/पंरा-१, दिनांक ६ जुलै, २००६.
२) शासन परिपत्रक क्रमांक : झेडपीए १००५/९४ मुस/प्र.क्र.१०४/पंरा-१, दिनांक ६ जुलै, २००६.

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

जिल्हा परिषदेमधील विविध अधिकारी/कर्मचारी यांना संबंधित जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी/सदस्य यांचेकडून व त्यांचे नातेवाईकांकडून अपमानास्पद वागणूक दिली जाते. असे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

जिल्हा परिषदांकडून त्यांचे क्षेत्रामध्ये विकासात्मक कामे जलदगतीने होणे अपेक्षित आहे. जिल्हा परिषदांचे अधिकारी व कर्मचारी आणि जिल्हा परिषदांचे पदाधिकारी हे जिल्हा परिषदांचे दोन प्रमुख आधारस्तंभ असून एकमेकांना पूरक आहेत. त्यामुळे दोन्ही आधारस्तंभांनी समन्वयाने जिल्हा परिषदांमध्ये काम करणे गरजेचे आहे. अन्यथा जिल्हा परिषदांची विकासात्मक कामे होऊ शकणार नाहीत.

पदाधिका-यांची कामे त्यांनी स्वत: करणे गरजेचे आहे. त्यांच्या निकट नातेवाईकांनी त्यांच्या कार्यालयीन कामामध्ये हस्तक्षेप करु नये. विशेषत: त्यांनी पदाधिका-यांच्या कार्यालयामध्ये मुळीच बसता कामा नये, असे आदेश शासन देत आहे. तसे आढळून आल्यास सदर पदाधिका-यांविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (पीठासीन प्राधिकारी) (गैरवर्तणूकीमुळे पदावरुन दूर करणे) नियम, १९९५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीमधील पदाधिकाऱ्यांवर कारवाई करता येईल. तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी गैरवर्तणूक केल्यास मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ३९(१) अन्वये सरपंच/उपसरपंच/सदस्य यांना गैरवर्तणूकीबद्दल विहित चौकशीनंतर कारवाईचे अधिकार विभागीय आयुक्त यांना आहेत.

मुख्य कार्यकारी अधिका-यांनी शासनाचे हे आदेश जिल्हा परिषदांच्या सर्व पंचायती राज संस्थांच्या पदाधिका-यांना प्रसृत करावे.

( कृ. मा. प.)



Scanned with CamScanner

सदर शासन परिपत्रक महाराष्ट शासनाच्या वेबसाईटवर **उपलब्ध** करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक **२००७०७१७१४५८४६००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( सुनील चव्हाण )
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) विभागीय आयुक्त (सर्व).

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).



Scanned with CamScanner